1 ★ RR(B)/300/4474

# B

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]

Total No. of Printed Pages : 12 ]

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45 ]

Total No. of Questions : 45 ]

**CCE RR**
**UNREVISED**
**REDUCED SYLLABUS**

Question Paper Serial No. **300**

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

**Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 31. 03. 2023 ] [ Date : 31. 03. 2023

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारचे 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

[ Turn over

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**Tear here**

**I. खालील प्रश्नांना प्रत्येक चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 6 × 1 = 6**

1. 'उज्ज्वल' या शब्दाचा संधी विग्रह असा होतो –

   (अ) उज् + ज्वल (ब) उत् + ज्वल

   (क) उज्ज्व + ल (ड) उत + ज्वल

2. 'माळ्याने बाग फुलवली' अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे –

   (अ) चतुर्थी (ब) सप्तमी

   (क) तृतीया (ड) पंचमी

3. "चिमणी घरटे बांधत होती." या वाक्यातील काळ ओळखा –

   (अ) अपूर्ण वर्तमानकाळ (ब) अपूर्ण भूतकाळ

   (क) पूर्ण भूतकाळ (ड) अपूर्ण भविष्यकाळ

4. खालीलपैकी कर्मणी प्रयोगाचे उदाहरण हे आहे –

   (अ) मी पुस्तक वाचतो (ब) तो पुस्तक वाचतो

   (क) तिने पुस्तक वाचले (ड) ती पुस्तक वाचते

5. 'बुडत्याला ............' म्हण पूर्ण करा.

(अ) जहाजाचा आधार (ब) डब्याचा आधार

(क) ओंडक्याचा आधार (ड) काडीचा आधार

6. 'प्रेतापुढे हातात धरलेले शिंकोळे.' या शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा –

(अ) डेरा (ब) हंडा

(क) टिटवं (ड) तांब्या

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा : 4 × 1 = 4**

7. ज्ञानप्रकाश : षष्ठी तत्पुरुष : : क्षणाक्षणाला : ................

8. सुंदर : विशेषण : : हिमालय : .............

9. आर्जव : विनवणी : : भास्कर : ..................

10. सफल : असफल : : दुःख : .......................

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7**

11. चिं. वि. जोशींनी मराठी साहित्यात कोणती दोन पात्रे लोकप्रिय केली ?

12. 'वाटणी' या कथेचे मूल्य कोणते ?

13. वाटणी कथेचे लेखक कोण ?

14. रुक्मिणी श्रीकृष्णाबरोबर कोणत्या पद्धतोने विवाह करू इच्छिते ?

15. रुक्मिणी लग्नाआधी कोणाचे दर्शन घेण्यास जाणार आहे ?

16. 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' या कवितेचा साहित्यप्रकार कोणता ?

17. भुकेलेल्या पोटांना कार्य वर्ज्य नाही ?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा :** **3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) गुत्तं घेणे ब) काळाला जिंकणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

'शीलाची किंमत शिक्षणाहून अधिक आहे.'

20. गण पाडून वृत्त ओळखा.

पावेन पाय शिवही नमितो जयाचे.

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा : $7 \times 2 = 14$**

21. जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्टी कारणीभूत होत्या ?

22. तात्यांच्या धाकट्या सुनेचे तात्यांबद्दलचे व त्यांच्या पत्नीबद्दलचे विचार लिहा.

23. विरहिणी म्हणजे काय ?

24. "माझी काही एकादशी नि दुप्पट खाशी अशातली गत नाही." संदर्भासह स्पष्टीकरण करा.

25. गंगूबाईच्या बालपणाविषयी थोडक्यात लिहा.

[ Turn over

26. तृणपात्याचा सत्कार कोणी कोणी केला ?

27. परिचय लिहा – प्र. के. अत्रे.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3**

28. अ) 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.'

**किंवा**

ब) 'वाचाल पुस्तक तर घडेल मस्तक.'

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा : 10 × 3 = 30**

29. 'अनंतशक्तिः परमेश्वरु' या कथेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

30. जपानी स्त्रीचे वर्णन करा.

31. आंबेडकरांचे विद्येविषयी मत लिहा.

32. 'क्रांतीज्योती सावित्रीबाई' या पाठाच्या आधारे 'सावित्रीबाई फुले' यांच्या गुणांचे वर्णन करा.

33. लेखकांच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?

34. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय करतो ?

35. श्रीकृष्णाला काय आवडणार नाही ?

36. 'पैल तो गे काऊ कोकताहे' कवितेचा सारांश लिहा.

37. 'धरण' कवितेत स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

38. भूक ही जगातील एकमेव सत्य आहे ? ते कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. 'विद्या आणि शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

40. गंगूबाईंनी संगीत शिकण्यासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले ? त्यांची गुरुनिष्ठा कोणत्या प्रसंगातून दिसून येते ?

**किंवा**

बेळगावी काँग्रेसमधील घटनांचे सविस्तर वर्णन करा.

41. 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ते लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

या भारतात ......................................

......................................................

......................................................

...................................... हो इस्लामी.

**किंवा**

खलनिंदका मनीही ..............................

.....................................................

.....................................................

............................... दे वरचि असा दे.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** **1 × 4 = 4**

43. महात्मा फुले म्हणतात, ज्याचे मन सत्याने पवित्र झाले तो जगातील सर्वात पवित्र माणूस. ज्या मनुष्याला मनाच्या पावित्र्याचे महत्व कळत नाही; तो मनुष्य धरणीस भार ठरतो. निर्दोषी आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य नि संपत्ती देते. आळशी मनुष्य दुष्ट असतो. तो समाजाचा शत्रू होतो. तो कधीही सुखी होत नाही. उद्योगी व शुद्ध चरित्र्याचा मनुष्य हा गरीबांचा वाली असतो. तो अनेकांना सुखी

करतो. सत्यप्रेमी, निमळ मन आणि शांत हृदय यातून धैर्य निर्माण होते. धैर्यशील मनुष्य हालअपेष्टा सहन करतो आणि संकटावर मात करतो.

**प्रश्न :**

अ) मनुष्याला आरोग्य व संपत्ती कशामुळे मिळते ? 2

ब) धैर्यशील माणूस कसा ओळखावा ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : 1 × 5 = 5**

44. मोबाईलचे व्यसन सुटण्यासाठी लहान भावाला मार्गदर्शन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

तुमच्या शाळेतील स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुण्यांना निमंत्रण देणारे पत्र लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. अ) मी स्वातंत्र्यसैनिक बोलतोय.

ब) माझे बाबा.